N.C.R.B (एन.सी.आर.बी.)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** मोहाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0309 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/12/2025 22:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 04/12/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/12/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:41 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/12/2025 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 036

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/12/2025 21:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विहीरगाव,मोहाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

# <u>फिर्याद</u>

पोलीस स्टेशन, मोहाडी
दिनांक : ०४/१२/२०२५

नाव:- डॉ. अरुणकुमार लक्ष्मण लोहार, वय ५३ वर्षे, पद पोलीस उप अधीक्षक, नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा जिल्हा- भंडारा, मोबाईल क्रमांक ९८७०३७६७०६

आम्ही अरुणकुमार लोहार, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा दिनांक २४/११/२०२५ चे १५:०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर असताना तक्रारदार श्री. राहुल मुरलीधर ढेंगे, वय २७ वर्षे रा. विहीरगाव, तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा व्यवसाय- शेती, (ग्रामपंचायत सदस्य) मो. क्र. ९१४५२४१११७ हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर आले. त्यांनी आम्हास त्यांची एका शासकिय कर्मचारी यांचे विरुध्द लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याचे सांगितले. आम्ही त्यांची तक्रार ऐकली व तक्रारदार श्री. राहुल मुरलीधर ढेंगे, यांना आपण तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दयावी असे सांगून त्यांना पेन आणि कोरा कागद उपलब्ध करुन दिला. त्यावरुन त्यांनी त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन आम्हास सादर केली. आम्ही त्यांचे अवलोकन केले असता तक्रार खालील प्रमाणे आहे.

<u>तक्रार अर्ज</u> ,भंडारा दिनांक २४/११/२०२५ प्रति, मा. पोलीस उपअधीक्षक साहेब, ॲन्टी करप्शन ब्युरो विभाग, भंडारा. **विषय** गैरअर्जदार हे लाच मागणी करीत असल्याने त्यांचेवर कारवाई होणे बाबत.

**अर्जदार** :- राहुल मुरलीधर ढेंगे, वय २७ वर्षे रा. विहीरगाव, तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा, व्यवसाय- शेती, (ग्रामपंचायत सदस्य) मो. क्र. ९१४५२४१११७

**गैरअर्जदार** :- प्रफुल गिरी, पद :- ग्रामसेवक ग्रामपंचायत विहीरगाव तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा.

**महोदय**, सविनय तक्रार अर्ज देतो की, मी मौजा विहीरगाव तालुका मोहाडी जिल्हा- भंडारा येथील रहिवाशी असुन कुटंबासह राहतो व ग्रामपंचायत विहीरगाव येथे मागील दोन वर्षा पासुन ग्रामपंचायत सदस्य म्हणुन आहे. आमचे गावचे ग्रामपंचायत मध्ये गैरअर्जदार हे ग्रामसेवक या पदावर मागील आठ वर्षा पासुन काम करीत आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत विहीरगाव येथील लोकांचे घरकुल संबंधाने सेल्फ सर्वे गैरअर्जदार श्री. प्रफुल गिरी यांनी मोबाईल ॲप द्वारे माहे मे २०२५ मध्ये केले होते. तेव्हा माझे वडील श्री. मुरलीधर गोविंदा ढेंगे यांचे सुध्दा घराचे सेल्फ सर्वे झाले होते. त्या सेल्फ सर्वे यादी मध्ये माझे वडीलाचे नाव होते व यादी मध्ये असलेल्या लोकांना टप्पा टप्पाने घरकुल मंजुर होणार आहेत.

मी ग्रामपंचायत सदस्य असल्याने माझे नेहमी ग्रामपंचायत मध्ये जाणे येणे होत असुन मी अंदाजे १५ दिवसा पुर्वी गैरअर्जदार श्री.प्रफुल गिरी ग्रामसेवक यांना माझे वडीलाचे घरकुला संबंधाने बोललो. तेव्हा ग्रामसेवक श्री. प्रफुल गिरी यांनी मला तुमच्या वडीलाचा घरकुल यादी मध्ये पहील्या टप्यात नाव आणायचे असेल तर ''१५,०००/-रुपये दया'' मी तुझ्या वडीलाचे घरकुल पहील्या टप्यात मंजुर करुन देतो असे बोलला. तेव्हा मी पाहुन घेवून असे बोलून वेळ काढुन घेतली. दिनांक २०/११/२०२५ गुरुवार ला मी ग्रामपंचायत मध्ये गेलो असता गैरअर्जदार श्री. प्रफुल गिरी यांनी मला पुन्हा घरकुलाचे काय झाले? १५,०००/-रुपये दिले नाही. घरकुल पहील्या टप्यात पाहीजे की नाही असे बोलले. त्यावेळी मी त्यांना आता पैसे नाही आहेत नंतर देतो असे बोललो होतो.

गैरअर्जदार श्री. प्रफुल गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव, तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा हे माझे वडीलाचे नावाने मंजुर घरकुल पहील्या टप्यात आणणे साठी स्वत: करिता १५,०००/-रुपयाचे लाच मागणी करीत असल्याने मला त्यांना लाच रक्कम दयावयाची नाही. माझे गैरअर्जदार यांचे सोबत कोणतेही आर्थीक व्यवहार नाही.

मी शेतीचे कामात व्यस्त असल्याने मी आज दिनांक २४/११/२०२५ रोजी गैरअर्जदार हे लाचेची मागणी करीत असल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणेस तक्रार देत आहे.

वर नमुद प्रमाणे तक्रारीवरुन आरोपी लोकसेवक श्री. प्रफुल गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत विहीरगाव तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा यांनी तक्रारदार यांचे कडे तक्रारीत नमुद प्रमाणे तक्रारदार यांचे वडीलाचे घरकुल पहील्या टप्यात आनने कामी १५,०००/-रुपयाचे लाचेची मागणी केली किंवा कसे? हे पडताळणी कार्यवाही करणे असल्याने दोन शासकिय पंच मिळणे करिता आमचे कार्यालयीन पत्र क्रमांक ९३४/२०२५,व ९३५/२०२५ दिनांक २४/११/२०२५ अन्वये पोलीस अंमलदार, विष्णू वरठी, लाप्रवि, भंडारा यांचे हस्ते मा. आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन विभाग, भंडारा, व मा.सह जिल्हा निबंधक वर्ग -१, भंडारा येथील दोन पंच १) श्री.

(डॉ. अरूणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ड. अरुणकुमार लक्ष्मण लोहार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडा,भंडारा,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडा,भंडारा,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870376706

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रफुल रतनगीर गिरी | | | 1. तिलक वार्ड,मोहाडी,मोहाडी, मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | एम आय कंपनीची माडेल 10आय | 5,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान | फाईल्स, कागदपत्र | आरोपीचे ताब्यातील चार्ज लिस्ट | 0.00 |



Scanned with OKEN Scanner

विजय भैय्यालाल सकतेल,वय ३५ वर्षे, पद:- सफाईगार, ( वर्ग-४ ) एस. टी. २), २) श्री. दिनेश किसन मडावी, वय ३६ वर्षे, पद कनिष्ठ लिपीक, (वर्ग-३) सह जिल्हा निबंधक वर्ग -१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, यांना पुरविल्याने आम्ही दोन्ही पंचांना आमची ओळख करुन देवून त्यांना पंच म्हणुन काम करण्याची संमती विचारुन दोन्ही पंचांना तक्रारदार श्री.राहुल मुरलीधर ढेंगे, यांची ओळख करुन देवून तक्रारदार यांची लेखी तक्रार वाचण्यास दिली. नमुद दोन्ही पंचांनी व आम्ही तक्रारदार यांचे लेखी तक्रारीवर स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार यांना गैरअर्जदार हे आपल्याला कुठे भेटतील या बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी गैरअर्जदार हे बुधवार आणि शुक्रवार ला ग्रामपंचायत मध्ये येतात. त्यामुळे ते आपल्याला दिनांक २६/११/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव येथे भेटतील परंतु ते कधी कधी ईतर दिवशी सुध्दा ग्रामपंचायत कार्यालयात येवून बसतात. त्यामुळे ते ग्रामंपचायत कार्यालय येथे हजर आल्यास मी आपणास त्याबाबत फोनवर माहिती देतो असे सांगून गैरअर्जदार यांनी यापुर्वीच मला पैशा बाबत बोलणी केल्याने ते आता ज्यावेळेस मला भेटतील त्याच वेळी पैसे मागण्याची शक्यता आहे असे दोन्ही पंचा समक्ष सांगितले. त्यामुळे गैरअर्जदार यांनी पडताळणी कार्यवाही वेळी लाच रक्कम मागणी केल्यास सापळा कार्यवाही आयोजित करुन लाच रक्कम गैरअर्जदार यांना देता यावी या करिता आम्ही तक्रारदार यांना गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम प्रात्यक्षीक कार्यवाही करणे करिता सादर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी १५,०००/- रुपये त्यांचे बॅक ऑफ इंडीया शाखा मोहाडीचे बॅक खात्यामधून काढुन सोबत आणले असल्याचे सांगून ते १५,०००/-रुपये दोन्ही पंचा समक्ष आम्हास सादर केले. आम्ही त्याची मोजणी केली त्यात ५००/-रुपये दराचे नोटाचे ३० नोटा असे एकुण १५,०००/-रुपये असल्याचे दिसुन आले त्यांचे क्रमांक आम्ही लॅपटॅपवर टाईप करुन त्यांची प्रिंट काढली दोन्ही पंच यांचे कडुन नोटावरील नंबर व टाईप केलेले नंबर पडताळणी करुन तक्रारदार आणि दोन्ही पंच यांना नोटांवर लावण्यात येणारे अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्रावायलेट टार्च संबंधाने सविस्तर माहिती देवून नोटांवर अॅन्थ्रासिन पावडर लावून अल्ट्रावायलेट टार्चचा प्रकाश टाकुन प्रात्यक्षीक करण्यात आले व ते प्रात्यक्षीक नोटा लिफाफ्यात ठेवण्यात आले. व तक्रारदार हे जेव्हा केव्हा गैरअर्जदार हे हजर आल्याबाबत माहिती देतील तेव्हा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक २८/११/२०२५ रोजी आम्ही, दोन्ही पंच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर असतांना वेळ अदांजे १०:४० वाजता तक्रारदार यांनी गैरअर्जदार हे ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव येथे हजर येणार आहेत आपण खरबी परिसरात या, मी आपणास तिथे भेटतो असे कळविले वरुन पडताळणी कार्यवाही करिता गोपनियतेच्या दृष्टीने खाजगी वाहन वापरण्याचे ठरवून खाजगी वाहनात पडताळणी/सापळा कार्यवाही संबंधाने साहीत्य व कागदपत्रे ठेवून पडताळणी/सापळा कार्यवाही करणे करिता दोन्ही पंच व कार्यवाहीतील सदस्य सह खाजगी चारचाकी वाहनाने रवाना होवून वेळ १२:५० वाजता ग्राम खरबी, तालुका- मोहाडी परिसरात पोहचलो आम्हास तक्रारदार हे ग्राम खरबीचे पलीकडील भागात त्याचे मोटार सायकल सुपर स्प्लेंडर दुचाकी नी रोडचे कडेला उभे असल्याचे दिसुन आले. आम्ही त्यांचे सोबत ग्राम खापा परिसरात बंद स्थितीत असलेल्या ''सराफ वेअर हॉऊस'' येथील निर्जन स्थळी गेलो व तिथुन पुढील पडताळणी कार्यवाही आयोजित करण्याचे ठरवून पडताळणी कार्यवाही करिता तक्रारदार आणि पंच क्रमांक १ यांना गैरअर्जदार यांचे ग्रामपचंयात कार्यालयात व्हॉईस रेकॉर्डर पंच क्रमांक १ यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करुन पाठविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार आणि दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाही संबंधाने सविस्तर माहिती देवून त्यात वापरण्यात येणारे व्हॉईस रेकॉर्डर आणि मेमरी कार्डचा वापर कशा प्रकारे करण्यात येतो याबाबत सांगून कार्यालातील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवीले. त्यांनतर **32GB SanDisk Micro SDHC'card** काढुन मेमरी कार्ड वरील क्रमांक पंचाकडुन खात्री करुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सेल टाकुन डेट आणि टाईम सेट करुन मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकण्यात आले. व्हॉईस रेकॉर्ड पंच श्री. विजय सकतेल, यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर वेळ १३:१३ वाजता सुरु करुन ते तक्रारदार यांचे गळयात घालुन तक्रारदार आणि पंच क्रमांक १ यांना गैरअर्जदार यांचे कार्यालयात पडताळणी कार्यवाही करिता तक्रारदार यांचे जवळील मोटार सायकलने १३:१४ वाजता रवाना केले होते. वेळ १३:५६ वाजता तक्रारदार, व पंच क्रमांक ०१ हे ''सराफ वेअर हॉऊस'' येथे परत आले. आम्ही तक्रारदार श्री.राहुल ढेंगे, यांचे गळयातुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्रमाक १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डीग बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये असलेल्या मेमरी कार्ड मधील **FOLDER-1** मध्ये फाईल क्रमांक **251128_1313** ही फाईल रेकॉर्ड झाली असल्याची दिसुन आली. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक ०१ श्री. विजय सकतेल यांचे कडुन पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेली हकिकत विचारुन घेतले. तसेच व्हॉईस रेकॉर्ड

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | रोखे | | 5 पेज | |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे 30नोटा | 15,000.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | 32जि बी क्षमतेची सनडिस्क कंपनीची मेमोरी कार्ड | 0.00 |
| 5 | इतर | संकीर्ण/विविध | 32जि बी क्षमतेची सनडिस्क कंपनीची मेमोरी कार्ड | 0.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | काळ्या रंगाची स्वेटर | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, तक्रारदार नामे श्री. राहुल मुरलीधर ढेंगे, वय 27 वर्ष रा. विहीरगाव, तालुका-मोहाडी, जिल्हा- भंडारा, यांचे वडील मुरलीधर ढेंगे यांचे घराचे यातील आरोपी लोकसेवक यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल संबंधाने मोबाईल अँप द्वारे माहे मे 2025 मध्ये सर्वे केले होते. त्या सेल्फ सर्वे यादी मध्ये तक्रारदार राहुल ढेंगे यांचे वडीलाचे नाव घरकुल यादी मध्ये पहील्या टप्यात आणुन देणे करिता यातील लोकसेवक यांनी 15,000/-रुपयाची लाचेची मागणी केली अशा आशयाचे प्राप्त तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्यात आली असता पडताळणी कार्यवाही मध्ये यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम मांगणी करुन स्विकारण्याची तयारी दर्षविल्याने आणि नमुद घटना ता. वेळी मागणी केलेली लाच रक्कम 15,000/-रुपये तक्रारदार श्री. राहुल मुरलीधर ढेंगे यांचे कडुन ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा येथे स्विकारल्याने आरोपी लोकसवेक यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा केल्याने फिर्यादी यांचे तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

surendra gopalrao belkhede(I (Inspector)) / DGPSGBM8105

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with OKEN Scanner

मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता त्यात तक्रारदार यांचे कडे गैरअर्जदार यांनी तक्रारीत मागणी केल्या प्रमाणे संभाषणात आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यास ''पैशाची आठवण करुन द्या साठी फोन केलता, विसरले का बा म्हणलं'' तेव्हा तक्रारदार यांनी ''किती देवा लागतील'' असे विचारले असता ग्रामसेवक यांनी ''तेवढे सांगितले तेवढे '' त्यावर तक्रारदार यांनी त्यांना ''काही कमी नाही होत'' असे बोलले तेव्हा आरोपीने ''तिथे का कमी होवाचे आहेत'' असे बोलले असल्याचे दिसुन आले.

त्यांनतर तक्रारदार यांनी आम्हास विनंती केली की, त्यांना महत्वाचे काम आल्याने ते आम्हाला कार्यवाही करिता वेळ देवू शकणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार यापुढे ग्रामपंचायत कार्यालयात हजर आल्यावर मी आपणास त्या बाबत माहिती देतो. त्यानंतर पुढील कार्यवाही करावी अशी दोन्ही पंचा समक्ष विनंती केल्याने पुढील कार्यवाही तक्रारदार हे माहिती देताच करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे लाप्रवि भंडारा येथे परत जावुन व्हॉईस रेकॉर्डर द्वारे मेमरी कार्ड मध्ये पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार आणि गैरअर्जदार यांचे रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण संभाषणाची स्क्रिप्ट काढुन व संभाषणाची फाईलची हॅश व्हॅल्यू काढुन तसेच मेमरी कार्ड वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन त्यावर आम्ही, दोन्ही पंचानी सही केल्या. कार्यवाहीचा पंचनामा तयार करुन त्यात सविस्तर नोंदी घेण्यात आले आहेत. पुढील कार्यवाही ही तक्रारदार यांचा फोन आल्यावर करण्याचे ठरविण्यात आले होते.

आज दिनांक ०४/१२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी आम्हास वेळ ११:३९ वाजता फोन करुन गैरअर्जदार हे आज रोजी ग्रामपंचायत कार्यालयात हजर येणार आहेत तरी आपण पुढील कार्यवाही करणे करिता पडताळणी करण्यात आलेल्या ठिकाणावर हजर यावे असे कळविल्याने आम्ही दोन्ही पंच हे कार्यालयात हजर असल्याने त्यांना या बाबत माहिती देवून सापळा कार्यवाही करिता लागणारे सर्व साहीत्य व कागदपत्रांसह आमचे चार चाकी खाजगी वाहन तसेच कार्यालयातील शासकिय मोटार सायकलने दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्य असे ''सराफ वेअर हाउस'' खापा येथे जाण्यास वेळ १३:०० वाजता रवाना होवून १३:४७ वाजता सराफ वेअर हाऊस , खापा येथे पोहचलो. थोडयाच वेळात तक्रारदार हे त्यांचे मोटार सायकलने आमचे जवळ आले व त्यांनी गैरअर्जदार हे ग्रामपंचायत विहीरगाव येथे हजर असल्याचे सांगितले. आम्ही तक्रारदार दोन्ही पंच कार्यवाहीतील सदस्यांना सापळा कार्यवाही संबंधाने त्यांची भुमीका समजावुन देवून सुचना दिल्या.

त्यांनतर वेळ १४:२४ वाजता रेकॉर्ड सुरु करुन त्यात आज रोजी नवीन 32GB SanDisk Micro SDHC card काढुन मेमरी कार्ड वरील क्रमांक पंचाकडुन खात्री करुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये डेट आणि टाईम सेट करुन मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकण्यात आले. पंच क्रमांक २ यांचे हस्ते तक्रारदार यांची अंगझडती घेवून त्याचे फुलपॅन्ट डावे बाजुचे समोरील खिशात सापळा बॅग मध्ये असलेले लाच रक्कमेचे लिफाफ्यातील ५००/-रुपये दराचे ३० नोटा ठेवून घेतल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर पंच क्रमाक १ याचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करुन तक्रारदार आणि पंच श्री. विजय सकतेल यांना तक्रादार यांचे मोटार सायकलने आरोपी लोकसवेक यांचे कार्यालयात रवाना करुन आम्ही, पोलीस हवालदार, मिथुन चांदेवार, अतुल मेश्राम, पंच क्रमांक २ असे आमचे खाजगी चारचाकी वाहनाने तसेच पोलीस अमंलदार विष्णू वरठी, सुमेध रामटेके, शासकिस मोटार सायकलनी तक्रारदार यांचे मागोमाग रवाना झालो व आरोपी लोकसेवक यांचे ग्रामपंचायत विहीरगाव चे बाहेर आपले अस्तित्व लपवून तक्रारदार यांचे ईशाऱ्याची वाट पाहत असतांना वेळ १४:४१ वाजता तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा दिल्याने आम्ही सर्व स्टाफ ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव येथे गेलो. पंच यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, पंच क्रमांक १ यानी आम्हास काळया पांढऱ्या रंगाची स्वेटर घातलेल्या व्यक्ती कडे बोट दाखवून त्यांनी पैसे स्विकारल्याचे सांगितल्याने सापळा कार्यवाहीतील सदस्याचे हस्ते आरोपी लोकसेवक यास ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना जवळ बोलावून घेवून त्यांचे गळयातुन व्हॉईस रेकॉर्डर बोहर काढून आरोपी लोकसेवक यांना आपली ओळख सागून त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रफुल रतनगिर गिरी, वय ४६ वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी, रा. तिलक वार्ड मोहाडी, श्री. संदीप गायधने यांचे घरी किरायाणे, मुळ पत्ता:- विडुळ ता. उमरखेड, जिल्हा- यवतमाळ असे सांगितले.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डीग पंच श्री. विजय सकतेल, यांचे आवाजात बंद करण्यात आले. तेव्हा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये असलेल्या मेमरी कार्ड मधील FOLDER-1 मध्ये फाईल क्रमांक 251204_1424 ही फाईल रेकॉर्ड झाली असल्याची दिसुन आली. आम्ही आरोपी लोकसेवक यास तक्रारदार यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे अंगात परिधान केलेल्या काळया पांढऱ्या रंगाचे स्वेटर

(डॉ. अरूणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):
6/12/25

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** surendra gopalrao b
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSGBM8105

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, मोहाडी
जिल्हा-भंडारा



Scanned with OKEN Scanner

चे उजवे बाजुचे खिशात ठेवले असल्याचे सांगितल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्रमाक २ श्री. मडावी, यांनी आरोपी लोकसेवक यांची अगझडती घेतली असुन त्यांचे अगझडती मधुन लाच रक्कम, मोबाईल फोन व ईतर साहीत्य मिळुण आल्याने त्याची अंगझडती यादी तयार करण्यात आली. लाच रक्कम पंच श्री. मडावी, यांचे हस्ते मोजुन पाहीले असता त्यात ५००/-रुपयाचे ३० चलनी नोटा असे एकुण १५,०००/-रुपये असल्याचे दिसुन आले. त्या नोटा आलोसे यांचे कार्यालयातील टेबलवर कोरे कागद ठेवून त्यावर पसरविण्यात आले. कार्यालयातील शिपाई आणि ऑपरेटर यांचे समक्ष आलोसे यांचे  तसेच कक्षातील दरवाजे खिडक्या व विद्युत दिवे बंद करुन आमचे पथकातील सदस्याचे हातावर अल्ट्रावायलेट टार्चच्या प्रकाशात चेक केले असता आलोसे यांचे दोन्ही हातावर, तसेच स्वेटरचे उजवे बाजुचे खिशाचे आत व स्वेटरचे उजवे हाताचे मनगटा जवळ अॅन्थ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. टेबलवर पसविण्यात आलेल्या नोटांवर सुध्दा टार्चच्या सहाय्याने प्रकाश टाकला असता नोटांवर सुध्दा अॅन्थासिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर नोटांवरील क्रमांक प्रात्यक्षीक मधील नोटांचे क्रमांका सोबत जुळवुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आल्याने ती लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने ते वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांचे सुध्दा हात अल्ट्रावायलेट दिव्याचे प्रकाशात चेक करण्यात आले. आरोपी लोकेसवक यांनी अंगात परिधान केलेली स्वेटर वेगळया जप्ती पत्रक तयार करुन जप्त करण्यात आले.

त्यानंतर आरोपी लोकसेवक यास तक्रारदार यांचे  घरकुल संबंधाने कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी ते मोबाईल फोनद्वारे सर्वे केले असल्याचे सांगितले तसेच त्यांनी आजच ग्रामपंचायत विहीरगाव ग्रामपंचायत अधिकारी पदाचा कार्यभार श्री. बी.के. जिभकाटे यांना सोपविला असल्याचे सांगून चार्ज लिस्ट सादर केल्याने ते सुध्दा जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले.

त्यांनतर आम्ही आलोसे व कार्यवाहीचे संपुर्ण साहीत्य व जप्ती मुद्देमाल सह पुढील कार्यवाही करिता पोलीस स्टेशन, मोहाडी येथे हजर येवून आरोपीस त्यांचे निवेदन लिहुन देणे करिता पेन, कागद उपलब्ध करुन दिला. तक्रारदार आणि पंच यांना सापळा कार्यवाही दरम्यान झालेल्या घटनाक्रमा बाबत विचारपुस केले. त्यांनी आरोपी लोकेसवक हे त्यांचे कार्यालयात हजर होते. त्यांचे सोबत कामा संबंधाने बोलणी केली. त्यांनतर थोडयावेळाने आरोपीने ''दया न त वेळ होत आहे'' असे बोलून लाच रक्कम स्विकारुन  लाच मोजुन घेवून ''तिस आहेत'' असे बोलुन  ठिक आहे असे बोलल्याने आम्ही त्यांचे कार्यालयाचे बाहेर आलो व तक्रारदार यांनी आलोसे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा केले असल्याचे सांगितले.

त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर मधील आज रोजी झालेले संभाषण रिवर्स फारवर्ड करुन ऐकले तसेच ते लॅपटॅपवर जोडणी करुन लागू संभाषणाची स्क्रिप्ट तयार केले. संभाषणाची स्क्रिप्ट व संभाषणाची फाईलची हॅश व्हॅल्यू काढुन ते मेमरी कार्ड वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन सीलबंद केले आहे. तसेच आरोपीचे मोबाईल फोनची पाहणी करण्यात आली असता त्यात घरकुल संबंधाने सर्वे करिता आवास प्लस २०२४  ॲप असल्याचे दिसुन येत असुन  सदर ॲप मध्ये आलोसे प्रफुल रतनगिर गिरी यांचे नावाचे अकाउंट दिसुन येत असुन त्यात ३८ सर्वे केले असल्याचे दिसुन येत आहे.  परंतु सदर सर्वे कुणाचे आहेत याबाबत माहिती दिसुन येत नाही. ते ऑनलाईन अपलोड झाले असल्याचे सांगून त्यांची हार्ड कॉपी सुध्दा निघत नसल्याचे सांगितले. आम्ही सुध्दा ते ओपन करुन पाहीले असता अपलोड माहिती दिसुन येत नसल्याने  सदर मोबाईल फोन वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले असुन जप्ती पत्रकावर आम्ही, पंच, आरोपी यांनी स्वाक्षरी केली आहे. कार्यवाहीचा पंचनामा तयार करण्यात आला असुन त्यात सविस्तर  नोंदी घेण्यात आले आहेत.

एंकदरीत यातील आरोपी लोकसेवक प्रफुल रतनगिर गिरी, वय ४६ वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी, रा. तिलक वार्ड मोहाडी, श्री. संदीप गायधने यांचे घरी किरायाणे, मुळ पत्ता:- विडुळ ता. उमरखेड, जिल्हा- यवतमाळ यांनी तक्रारदार श्री. राहुल मुरलीधर ढेंगे यांचे वडीलाचे घरकुलचे पहील्या टप्प्यात आणणे साठी स्वत: करिता १५,०००/-रुपयाचे लाच मागणी केल्याचे दिनांक २८/११/२०२५ रोजीचे पडताळणी कार्यवाही मध्ये निष्पन्न झाल्याने आणि दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान स्विकारल्याने आरोपी लोकसेवक प्रफुल रतनगिर गिरी, वय ४६ वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी, रा. तिलक वार्ड मोहाडी, श्री. संदीप गायधने यांचे घरी किरायाणे, मुळ पत्ता:- विडुळ ता. उमरखेड, जिल्हा- यवतमाळ यांनी कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा केल्याने त्यांचे विरुध्द सरतर्फे फिर्याद देत आहे.

4/12/2025

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner